# महात्मा गांधींचे आर्थिक विचार: एक विश्लेषण

**सौ. पौर्णिमा प्र. वानखडे,**
गांधी विचारधारा विभाग,
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ नागपूर.
Email:
pournimaramekarwankhade@gmail.com

---

***गोषवारा :***

*महात्मा गांधी फक्त राजकीय नेते म्हणून जगात ओळखले जात नाहीत तर ते समाजसुधारक ,तत्त्वचिंतक व आर्थिक विचारवंत अशीही आपली ओळख ठेवतात.गांधींचे आर्थिक विचार पारंपारिक अर्थशास्त्राच्या चौकटीपेक्षा निराळे व मानवी मूल्याधारित होते.गांधींच्या अर्थशास्त्रात नैतिकता आणि सामाजिक समता या दोहोंना स्थान मिळावे म्हणून प्रकर्षाने केलेले प्रयत्न निदर्शनास येते. विश्वस्तकल्पना ,स्वदेशी, लघुउद्योग,ग्रामस्वराज यासारख्या संकल्पनांद्वारे एक न्याय्य व समतावादी अर्थव्यवस्थेची गांधींनी मांडणी केली. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सत्य आणि अहिंसा हे गांधीवादी तत्वज्ञानाचे द्विआधारी आधारस्तंभ आहेत. सत्य आणि अहिंसेवर गांधींचे तत्वज्ञान रुजल्याचे दिसून येते. देशातील तत्कालीन परिस्थिती पाहता स्वदेशीच्या माध्यमातून आत्मनिर्भरता आणण्याचे त्यांचे प्रयत्न नजरेतून सुटत नाहीत.गांधींना केवळ राजकीय स्वातंत्र्य नको होतं तर देशांतर्गत उत्पादन आणि स्वयंपूर्णतेवर आधारित आर्थिक स्वायत्तता आणायची होती. स्वदेशीचा वापर आणि ब्रिटिश उत्पादनावरील बहिष्कारा मागे त्यांच्या वसाहतवादी राजवटींविरुद्ध आर्थिक प्रतिकार करणेच तेव्हढे नव्हते तर ग्रामीण भारताला सक्षम बनवू शकणाऱ्या विकेंद्रित अर्थव्यवस्थेचा तो व्यापक दृष्टिकोन होता. गांधींच्या मते स्वावलंबी अर्थव्यवस्थेद्वारे संसाधनांचे न्याय्य वितरण ,गरिबी निर्मूलन आणि श्रमप्रतिष्ठा प्राप्त होऊ शकणार होती. नैतिकता, पर्यावरणीय शाश्वतता,आत्मनिर्भरता,सामाजिक न्याय्य यासाठी मात्र गांधींचे विचार अभ्यासण्याची गरज निर्माण होते. त्यावर चिंतन,विश्लेषण करण्याची आवश्यकता जाणवते. प्रस्तुत संशोधन पत्राचा हेतू गांधींच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचे चिकित्सक विश्लेषण करणे, त्याच्या मर्यादा व त्यांच्या सामर्थ्याचा अभ्यास करणे आणि वर्तमानातील त्याची उपयुक्तता अधोरेखीत करणे हे आहे. गांधींचे आर्थिक विचार आधुनिक सी .एस .आर, शाश्वत विकास व स्थानिक अर्थव्यवस्थेच्या संकल्पनांशी अत्यंत सुसंगत असून आजही उपयुक्त आहेत. आर्थिक प्रश्नांची उकल करण्याची क्षमता गांधींच्या आर्थिक विचारातून दिसून येते.*

**बीज शब्द :** महात्मा गांधी, विश्वस्तकल्पना, सर्वोदय, नैतिकता, शाश्वत विकास, ग्रामस्वराज, स्वदेशी.

---

**प्रस्तावना :**

गांधींच्या आर्थिक विचारांचा मूळे ही त्यांच्या आध्यात्मिक आणि नैतिक मूल्यांमध्ये खोलवर रुजलेली होती. इंग्लंड व द. आफ्रिकेत असताना सत्य,न्याय, सामजिक विषमतेचा त्यांनी अनुभव घेतला होता,तेव्हाच

त्यांच्या विचारांचा पाया घातला गेला, रस्किनचे अन् टु धिस लास्ट, टॉलस्टायचे अहिंसेवरील तत्वज्ञान, श्रीमद्भगवद्गीता यांनी त्यांच्या आर्थिक दृष्टिकोनावर प्रभाव टाकला. त्यामुळे गांधी विचार हे केवळ आर्थिक व्यवस्थेचे तांत्रिक विश्लेषण नसून त्यात धार्मिकता,नैतिकता आणि आत्मशुद्धी यांचा संगम आहे.

पारंपारिक अर्थशास्त्र हे नफा, उत्पादन आणि वाढ, विकास यावर केंद्रीत असते.व्यक्ती हा उपभोक्ता मानला जातो आणि विकासाचे मोजमाप जी. डी. पी किंवा उत्पादनाने केले जाते. याउलट गांधी विचार नैतिकता,गरजांची पूर्तता,समता,मानवी मूल्ये यावर आधारित आहेत, मनुष्यकेंद्रित आहेत. येथे व्यक्तीला श्रमिक आणि नैतिक घटक मानले जाते. शाश्वत विकासासाठी प्रयत्न करणारी गांधींची अर्थव्यवस्था आहे. स्पर्धे ऐवजी सहकार्य आणि संसाधनांच्याशोषणाऐवजी सुसंवादाला प्राधान्य दिले आहे.

आजच्या जागतिकीकरण, पर्यावरणीय संकट आणि आर्थिक विषमतेच्या युगात गांधीच्या विचारांचे पुनरावलोकन होणे आवश्यक आहे.सी.एस.आर, एस.डी.जी आणि इ.एस.जी यांसारख्या आधुनिक संकल्पना गांधी विचारांशी सुसंगत असल्या तरी त्याचा सार्थ वापर झाल्याचे दिसत नाही. म्हणूनच गांधी विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे आणि त्याची आधुनिक उपयुक्तता अधोरेखित करणे हे संशोधनाचे मुख्य प्रयोजन आहे.

वर्तमानात भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे गांधीच्या आर्थिक विचारात आहेत. मोठ्या संख्येत युवावर्गाची संख्या असणारा आपला देश बेरोजगारीच्या समस्येने ग्रासला आहे .गांधींच्या आर्थिक विचारांचे अवलोकन केल्यास अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. मोठ्या प्रमाणात मानवी संसाधने उपलब्ध असल्याने त्यांच्या सर्वंकष विकासाची बीजे गांधीवादी अर्थशास्त्रात दडली आहेत.गांधींच्या स्वदेशीतून आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकारायला वेळ लागणार नाही.मूठभर लोकांच्या हाती एकवटलेल्या संपत्तीचे त्यांना विश्वस्त होण्यास प्रवृत्त केल्यास सामाजिक न्यायाची आर्थिक विषमता आपोआप येईल. सत्य आणि अहिंसा तत्त्वावर निर्मित नवीन समाजाला वेगळ्याने नैतिकतेची शिकवण द्यावी लागणार नाही. सामाजिक समता, शाश्वतता, श्रमावर आधारित अर्थव्यवस्था,सहकार्य,अहिंसा हे सर्व गांधींच्या मानव केंद्रित अर्थव्यवस्थेचे पैलू आहेत. प्रस्तुत शोधनिबंधातून गांधींच्या आर्थिक विचारांचे विश्लेषण त्यांची सामाजिक व नैतिक पार्श्वभूमी ,वर्तमानातील त्याची उपयुक्तता आणि मर्यादा यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे :**

1. महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची मूलभूत तत्वे स्पष्ट करणे.
2. गांधीच्या आर्थिक विचारांचे चिकीत्सक विश्लेषण करणे.
3. वर्तमान अर्थव्यवस्थेत गांधी विचारांची उपयुक्तता तपासणे.
4. गांधींच्या विचारांचे सी. एस.आर,शाश्वत विकास व आत्मनिर्भर भारत यासारख्या आधुनिक संकल्पनांशी संबंधित अनुबंध विश्लेषित करणे.

**गृहितके :**

1. गांधीचे आर्थिक विचार केवळ आदर्शवादी नसून काही प्रमाणात आधुनिक संदर्भात उपयुक्त आहेत.
2. नैतिक मूल्ये व आर्थिक धोरण यांचे समायोजन शक्य आहे.

3. ग्रामीण आणि स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत केल्यास एकात्मिक विकास साधने शक्य आहे.
4. सी.एस.आर व एस.डी.जी सारख्या आधुनिक संकल्पना गांधी विचारांशी सुसंगत आहेत.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम सामग्रीवर आधारित असून गांधींच्या विचारांवर उपलब्ध लिखित साहित्याचा अभ्यास, वर्तमानपत्रातील लेख ,महाजाल येथील आर्थिक विचारांचा अभ्यास करून महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.प्रस्तुत शोध निबंधाच्या निष्कर्षांना मर्यादा आहेत.

**महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांतील महत्त्वपूर्ण पैलू :**

स्वदेशी: गांधीवादी आर्थिक विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे 'स्वदेशी'अशा वस्तूंच्या वापरावर भर देतो ज्या आपल्या देशात आणि परिसरात उत्पादित होत असतात.यामुळे आत्मनिर्भरता येऊन आपण वस्तू आयात करण्यापासून परावृत्त होतो .अनेक दशके भारत परदेशी शक्तींवर अवलंबून राहिला.स्थानिक उत्पादनात,गांधींनी सामुदायिक सक्षमीकरण आणि संसाधनावरील अवलंबित्व दूर करण्यास प्रोत्साहन दिले.गांधींची स्वदेशीची कल्पना स्पष्ट असल्याची प्रचिती त्यांच्या पुढील वक्तव्यावरून येते. गांधी म्हणतात,"ज्यांचे नियंत्रण,दिग्दर्शन आणि व्यवस्थापन हे मॅनेजिंग एजंट्स यांच्या द्वारे भारतीयांच्या हातात असेल,त्या भारतीय कंपन्या होत. भारतीय नियंत्रणात परकीय भांडवल आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्यास त्यांची हरकत नसल्याचेही गांधी सांगतात. त्यांच्या मते कोणत्याही उद्योगाचा उद्देश हा केवळ उत्पादनाचा न ठेवता बेकारी निर्मुलनाचा प्राधान्याने असावा,असे मत मांडतांना देशी उद्योगांमध्ये यंत्रोद्योग व ग्रामोद्योग या दोन्हीचा समावेश असावा.याच विचारातून गांधीजींनी ’अखिल भारतीय चरखा संघ’,’ग्रामोद्योग संघ’ स्थापन केले.

**स्वदेशीचे तत्वज्ञान :**

आपल्या जवळच्या शेजाऱ्यांच्या सेवेच्या कल्पनेभोवती फिरते. त्यांच्या मते स्वदेशी ही नम्रता आणि प्रेमाच्या नियमांशी सुसंगत असा एकमेव सिद्धांत आहे. गांधींसाठी स्वदेशी ही आध्यात्मिक अत्यावश्यकता होती. स्वदेशी वसाहतवादी ब्रिटिश भारताविरुद्ध राष्ट्र निर्माण करण्याच्या शोधात विकसित झालेली संकल्पना आहे. स्वदेशी चळवळीचा उद्देश ब्रिटनपासुन भारता ची आर्थिक स्वयंपूर्णता प्रस्थापित करून स्वराज्य मिळविणे हा होता. गांधींचे स्वदेशी तत्त्वज्ञान स्वत:ची अर्थव्यवस्था आणि ओळख जपण्यासाठी जागतिकीकरणा च्या काळात प्रेरणादायी आहे.

**विश्वस्तकल्पना :**

समूहाचा आर्थिक विकास होताना एकही वर्ग त्यातून सुटणार नाही याची आपण काळजी घ्यायला हवी असे गांधीजी म्हणत. त्यातूनच विश्वस्त कल्पना उदयास आली. हे एक नाविण्यपूर्ण तत्त्वज्ञान होते,जे संपत्ती,वित्त आणि व्यापक अर्थव्यवस्थेतील संबंधांवर जोर देते. देशातील आणि जगातील असमान आर्थिक व्यवस्थेला पर्याय म्हणून ही संकल्पना त्यांनी पुढे आणली. या संकल्पने नुसार व्यक्ती आणि व्यवसायांनी त्यांची संपत्ती आणि संसाधने

हे स्वतःच्या स्वार्थासाठी न साठवता तसेच त्याचा वापर शोषणा साठी न करता समाजासाठी करण्याचे हा सिद्धांत सांगतो. याचा मुख्य गाभा म्हणजे संपत्तीचा वापर सामाजिक असमानता दूर करण्यासाठी आणि सामाजिक न्यायाला चालना देण्यासाठी केला जावा. काही लोकांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण म्हणजे सामाजिक कल्याणासाठी हानिकारक आहे आणि श्रीमंतांचे कर्तव्य आहे की वंचित वर्गाच्या उन्नतीसाठी धनिक वर्गाने त्यांच्या संसाधनांचे स्वेच्छेने पुनर्वितरण केले पाहिजे.श्रम आणि प्रबंध यांच्यातील सुसंवादासाठी विश्वस्त संकल्पना गांधींना आवश्यक वाटते.ही संकल्पना संपत्तीचे पुनर्वितरण आणि प्राप्तीकर आकारणीच्या तत्वांशी मिळतीजुळती आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने मिश्र अर्थव्य स्वीकारली आणि गांधीजींच्या या संकल्पनेचा काही प्रमाणात स्वीकार केला. आजच्या काळात भांडवली व्यवस्था जोरदारपणे वाढत असताना गांधींच्या या संकल्पनेचा विचार केला जाऊ शकतो.

वर्तमानात सी एस आर ही संकल्पना जोरात राबविली जात आहे. मोठमोठ्या कंपन्यांनी आपल्या नफ्यातील काही रक्कम समाजाच्या हितासाठी खर्च करणे हे कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी मध्ये सांगितली जाते. गांधींच्या विश्वस्त कल्पनेला न्याय देणारा असा हा प्रकार साजेसा आहे. आर्थिक धोरणे आखताना सरकार विश्वस्त कल्पनेचा मार्गदर्शक तत्व म्हणून वापर करु शकतात. यामध्ये उत्पन्नातील असमानता कमी करण्यासाठी प्रगतिशील कर प्रणाली लागू करणे आणि वंचितांना आधार देण्यासाठी सामाजिक सुरक्षा प्रदान करणे या गोष्टींचा समावेश होऊ शकतो.

**विकेंद्रीकरण :**

लोकांना सुखी करून त्यांच्या नैतिक व आध्यात्मिक उन्नतीसाठी विकेंद्रीकरण आवश्यक असल्याचे गांधी मानतात. केंद्रीकरण हिंसक परिस्थिती निर्माण करणारे आहे. भारतासारख्या देशासाठी जिथे मोठ्या प्रमाणात खेड्यांची संख्या आहे,उद्योग विकेंद्रीत स्वरूपाचे असणे गरजेचे आहे. राज्याच्या मालकीचे विकेंद्रीत स्वरूपाचे उद्योग निर्माण केल्यास अनेकांना रोजगार मिळेल.बेरोजगारीच्या समस्येवर रामबाण उपाय म्हणजे विकेंद्रीकरण. त्यामागे गांधीचा युक्तिवाद असा आहे की मोठ्या उद्योगांसाठी आणि देशाचे औद्योगिकीकरण करण्यासाठी प्रचंड प्रमाणात भांडवल संचय आवश्यक आहे जे भारतासारख्या लोकसंख्येची घनता असणाऱ्या देशासाठी इष्ट नाही. औद्योगिकीकरणाने निर्माण झालेल्या असंख्य राजकीय,सामाजिक आणि सांस्कृतिक समस्यांबद्दलच्या त्यांच्या तीव्र आणि जवळजवळ भविष्यसूचक अंतरदृष्टीचा तो परिणाम होता. मोठ्या उद्योगांचे स्वरूपच असे आहे की आर्थिक

सत्ता मोजक्या लोकांच्या हाती केंद्रीकृत केली जाते. भांडवलशाहीत भांडवलदारांच्या हातात व समाजवादात ती व्यवस्थापक, तंत्रज्ञ आणि नोकरशहा यांच्याकडून अहंकाराने घेतली जाते.औद्योगिकीकरण श्रमविभाजनावर आधारित असल्याने ते माणसाच्या आत्मअभिव्यक्तींवर मर्यादा घालते.नैतिक गरजा पूर्ण करण्याचे सामर्थ्य औद्योगिकीकरणात असत नाही.एकाधिकारशाही वाढते.वर्तमानातील बेरोजगारीच्या समस्येवर एकमेव उपाय म्हणजे उद्योगांचे विकेंद्रीकरण होय.

**स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था :**

भारत खेड्यांचा देश असल्याने भारताचा विकास खेड्यांच्या विकासावर अवलंबून आहे, हे ओळखून

गांधींनी खादी,हातमाग,रेशीम शेती,हस्तकला,गोपालन इ.ग्रामीण उद्योगांच्या वाढीवर भर दिला. श्रम आणि अल्प भांडवलावर अवलंबून असणारे ग्रामीण उद्योग भारतासाठी वरदानच!उपलब्ध कच्चा माल वापरून उत्पादीत वस्तू स्थानिक बाजारपेठेत विकल्या जातात. शेतीवरील भार कमी करण्यासाठी गांधी कुटीर उद्योग सुचवितात ज्यामुळे शहरात होणारे स्थलांतर थांबेल,शिवाय शहराच्या गरजा पूर्ण करण्याचे सामर्थ्यही ग्रामीण उद्योगात आहे,अतिरिक्त वस्तू निर्यात देखील करू शकतात. प्रत्येक गाव एक स्वयंपूर्ण प्रजासत्ताक असावे, अतिरिक्त उत्पादन गावातील गरिबांना वाटल्यास उपासमार टाळता येईल. गावातील अर्थव्यवस्था दोन महत्वाची उद्दिष्टे पूर्ण करेल .पहिले,ते रोजगार निर्मिती करतील आणि दुसरे,ते समानता, स्वातंत्र्य आणि न्याय्य निर्माण करतील. आत्मनिर्भर गावे स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याचे सामर्थ्य निर्माण करून पर्यावरणाचे जतन करतील.

वर्तमान परिस्थितीत गांधी विचार ग्रामीण भागासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. गावांची झालेली दुर्दशा ,बेकारी, शहरांकडे वाढती धाव,गरिबी,नैसर्गिक संसाधनांचा अपव्यय इ.साठी गांधींचे आर्थिक विचार यातून बाहेर काढण्यास सहाय्यक ठरतील.

**औद्योगिकीकरण (उपयुक्त तंत्रज्ञान) :**

१९४६ मध्ये गांधी लिहितात,"मी यंत्रसामग्रीला विरोध करत नाही. मी त्या यंत्रांना विरोध करतो जी श्रम विस्थापित करतात,त्यांना निष्क्रिय बनवतात. लोकांना निष्क्रिय बनवून बेरोजगारीची समस्या निर्माण करणाऱ्या यंत्रांच्या विरोधात गांधी होते. त्यांच्या मते यंत्रांनी मनुष्याचे श्रम कमी करावे,त्यांची उत्पादकता वाढवावी,मनुष्याला गुलाम बनविणारी यंत्रे गांधींच्या यादीत नव्हती. यंत्रावर मनुष्याचे नियंत्रण असावे,श्रम केंद्रित तंत्रज्ञानाचा जोरदार पुरस्कार त्यांच्या काळातील भारताच्या कामगार_ अतिरिक्त आणि भांडवलाच्या कमतरतेच्या अर्थव्यवस्थेसाठी पूर्णपणे तर्कसंगत होता.

**आर्थिक समानता :**

देशातील आर्थिक विषमतेवर आघात करून समतेचा पाठपुरावा करणारे गांधी हेच लोकाभिमुख वृत्तीचे एकमेव राजकीय पुढारी होते. श्रीमंत आणि गरीब बुद्धिजीवी आणि श्रमजीवी यांच्यातील आर्थिक विषमता त्यांना अनर्थकारक वाटत होती. विषमतेवर आधारलेला समाज कधीही अहिंसक राहू शकत नाही,अशी गांधीजींची धारणा होती. आज याच आर्थिक विषमतेमुळे सर्वत्र हिंसाचार बोकाळला आहे,जेथे ज्या वस्तूंची गरज आहे, तिथेच त्यांचे उत्पादन झाल्यास उत्पादनाच्या सामुदायिक वेडावर आपसूकच नियंत्रण येईल आणि उत्पादन मर्यादित झाले की विभाजन समान होईल.सामुदायिक शेती हा गांधींच्या जिव्हाळयाचा आणखी एक विषय होता ज्यातून अनेक समस्यांचे निराकरण होऊन शेती करणे सुलभ होणार होते.

**सर्वोदय संकल्पना :**

जॉन रस्किन चे पुस्तक "Unto This Last" च्या प्रभावातून सर्वोदयाचा उदय झाला.सर्वांचे कल्याण म्हणजे सर्वोदय.सर्वोदयात सर्वांच्या कामांना सामान मूल्य असते.प्रत्येक व्यक्तीला आपल्या गरजा पूर्ण करण्याची सामान संधी मिळते.सर्वोदयाच्या माध्यमातून समाजाचे परिवर्तन करणे गांधींना अपेक्षित होते.यात मोठ्या उद्योगांचा विस्तार मर्यादित असेल.यंत्रांचा वापर मर्यादित असेल.सर्वोदयाची कल्पना,भांडवलशाही,समाजवादी आणि

लोकशाही समाजाच्या विरोधी आहे असे नाही यात चांगल्या गुणांचा स्वीकार आणि वाईट गुणांचा त्याग सुचविला आहे.सर्वोदय अर्थव्यवस्था ही अक्षयसंसाधनावर उभारली पाहिजे. वनीकरण आणि शेती यासारख्या अक्षय संसाधनावर आधारित संस्कृती ही कोळसा, तेल,धातू यासारख्या संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ आहे.

गांधींच्या आर्थिक सर्वोदय संकल्पनेमध्ये केवळ आर्थिक वाढ नव्हे तर नैतिकता,समता आणि श्रमाला प्रतिष्ठा देणारी समाजव्यवस्था दिसते.हे केवळ आदर्श नाही तर सामाजिक आणि आर्थिक समतेसाठी आवश्यक दिशादर्शन आहे.

**व्यक्तिमत्व विकासाची तत्वे :**

गांधींचा अर्थशास्त्राचा अभ्यास हा त्यांच्या नैतिक व आध्यात्मिक सिद्धांतावर आधारलेला आहे.साधेपणा व समाधानी वृत्ती प्रत्येकाने अंगी बाळगली पाहिजे.भौतिक गरजा वाढवीत त्या मिळवण्यासाठी हाव न बाळगणे व इतरांना जे मिळत नाही ते आपल्यालाही नको ही वृत्ती जोपासणे हे व्यक्तीच्या जीवनाचे सूत्र असले पाहिजे.प्रामाणिकपणा व संयम यात सुसंगती ठेवली पाहिजे.सत्य आणि अहिंसा या दोन गोष्टी व्यक्तीच्या जीवनाचा अविभाज्य भाग असाव्यात.गांधीजी अहिंसेला सर्वश्रेष्ठ ताकद मानीत .गांधींचे अर्थशास्त्र 'मानवकेंद्रीत'आहे ,मानवाच्या गरजांतून निर्माण झाले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**शाश्वत विकास आणि पर्यावरणीय सुसंवाद :**

गांधींच्या काळात शाश्वत विकास हा शब्द कदाचित वापरात नसेल,पण त्यांचे विचार मात्र शाश्वत आहेत,यात शंका नाही,.साधेपणा, संसाधनांचा अपव्यय टाळणे आणि निसर्गाशी सुसंवाद संबंधांचा ते आग्रह धरताना दिसतात.त्यांच्या स्वावलंबनाच्या मॉडेलने मानवी गरजा आणि पर्यावरण यांच्यातील संतुलित संबंधांना प्रोत्साहन दिले.

**निष्कर्ष :**

महात्मा गांधींचे आर्थिक विचार हे पारंपारिक भांडवलशाही किंवा समाजवादी चौकटींपेक्षा पूर्णतः वेगळे, मानवतावादी आणि नैतिकतेवर आधारित होते. गांधीजींना अर्थशास्त्र म्हणजे केवळ नफ्या तोट्याचा हिशोब वाटत नव्हता,तर तो समाजातील प्रत्येक घटकाच्या कल्याणाशी निगडीत असावा,असे त्यांचे मत होते. त्यांच्या आर्थिक विचारांची मुळं भारतीय ग्रामीण जीवनशैलीत, आत्मनिर्भरतेत आणि पर्यावरणस्नेही मूल्यांमध्ये होती.

त्यांच्या आर्थिक तत्वज्ञानाचे केंद्रस्थान "सर्वोदय" म्हणजेच सर्वांचा विकास हे होते. ग्रामस्वराज, स्वदेशी, श्रमप्रतिष्ठा, आर्थिक समता, विश्वस्त कल्पना, विकेंद्रीकरण, शाश्वत विकास, स्वावलंबन, व्यक्तिमत्व विकासाची तत्वे ही त्यांच्या विचारसरणीतील प्रमुख तत्वे होती.त्यांनी आधुनिक औद्योगिकीकरणावर टीका केली,कारण ते माणसाचे मुळापासून नुकसान करते आणि पर्यावरणाचा ऱ्हास करते.त्यांना शाश्वत व नैतिक अर्थव्यवस्था हवी होती,जी स्थानिक संसाधनांवर आधारित माणसाला केंद्रस्थानी ठेवणारी आणि सर्व घटकांना न्याय्य देणारी होती.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि निसर्ग विनाशाच्या पार्श्वभूमीवर गांधींचे विचार अधिकच प्रासंगिक

वाटतात. सेंद्रिय शेती,लोकल टू ग्लोबल उत्पादन आणि स्थानीय अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन ही संकल्पना आता जागतिक पातळीवर चर्चेत आली आहे.आर्थिक विषमतेने ग्रासलेल्या आजच्या समाजात गांधीजींच्या समता व नैतिकता आधारित अर्थव्यवस्थेची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते.

एकूण निष्कर्षतः गांधींचे आर्थिक विचार केवळ विचारांपुरते मर्यादित नव्हते,तर ते कृतिशील जीवनशैलीचा आग्रह धरणारे होते.आजही ते प्रेरणा देतात की, अर्थव्यवस्था ही माणसासाठी असावी,माणूस अर्थव्यवस्थेसाठी नव्हे,त्यांची तत्वे ही सामाजिक न्याय,पर्यावरणीय शाश्वतता आणि सर्व समावेशक विकास या मूलभूत मूल्यांना चालना देणारी आहेत.त्यामुळे नव्या आर्थिक मॉडेल चा विचार करताना गांधींचे विचार हे दृष्टिकोन व दिशा दोन्ही देणारे ठरतात.

**संदर्भ :**


- Bharati,K.S ,The Economic Thought of Mahatma Gandhi,1995.
- गांधीजी, परमंधाम प्रकाशन, पवनार.
- कुमारप्पा,जे.सी.,गांधी विचार वाराणसी, सर्वसेवा प्रकाशन,1959.
- Mahatma Gandhi,The Story Of My Experience With Truth,Navjeevan Publication,1957.
- https://www.mkgandhi.org.
- Pandey Janardan, Gandhi and 21st Century, New Delhi, Concept Publishing Company,1998.
- Sinha.Raman, Encyclopaedia of Gandhian Philosophy (Vol.7).
- https://www.sudharak.in.
- आर्थिक विचारांचा इतिहास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 2020.